संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# विकृतीच्या संहारासाठी होलिकोत्सव

**भारतीय** कालगणनेचा शेवटचा महिना असलेल्या फाल्गुनात पौर्णिमेला येणारा होळीचा सण म्हणजे सामाजिक संस्कृतीचे संवर्धन करणारा महत्त्वपूर्ण सण ठरतो. आजच्या दिवशी देशभर वेगवेगळ्या पद्धतीने होळी साजरी होते. उत्तर भारतात त्याचे विशेष प्रस्थ पाहायला मिळते. तर महाराष्ट्रात कोकणात 'शिमगा' या नावाने या सणाचे आगळेवेगळेपण रूढ झालेले दिसून येते. आजचे विज्ञान तंत्रज्ञान युग किंवा आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उंबरठ्यावर सगळं जग असताना भारतासारख्या देशात ही सणपरंपरा कायम टिकवून ठेवण्याचा अट्टाहास अतिशय मोलाचा ठरतो. विज्ञानाने अनेक शोध लावले. तंत्रज्ञानातून अनेक सुखसाधने मनुष्याच्या दिमतीला आली. परंतु मनाचे समाधान मिळवून देण्याचे काम विज्ञान किंवा तंत्रज्ञान करू शकलेले नाही. त्यासाठीच सण, उत्सव, व्रतवैकल्य किंवा परंपरांच्या माध्यमातून जपले गेलेले संस्कार महत्त्वाचा आधार ठरले आहेत. आजचा होळीचा सण अशीच प्राचीन परंपरेची एक अखंड संस्कारधारा म्हणावी लागेल. होळीच्या सणामागचे पौराणिक संदर्भ वेगवेगळ्या प्रकारे सांगितले जातात. मग अगदी हिरण्यकश्यपूने आपला मुलगा प्रल्हाद हा सतत नारायणाचे स्मरण करतो. या द्वेषातून त्याचा वध करण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्याची बहीण होलिका जिला अग्नीपासून अभय मिळाले होते. तिच्या मांडीवर बसून प्रल्हादाला नाहीसे करण्याचा प्रयत्न झाला. परंतु त्यात होलिका जळून खाक झाली. प्रल्हाद मात्र जिवंत राहिला. कथानक अतिशय साधे आहे. अनेकांना ते भाबडेपणाचे लक्षण वाटू शकेल. परंतु अनेक कथापुराणांमधून समाजाचे मन ओळखून अतिशय महत्त्वाचा संदेश दिला जातो. ईश्वराची आराधना करणाऱ्यांना सर्व प्रकारचे संरक्षण मिळते किंवा सद्विचार आणि सद्भावना जोपासणाऱ्यांना कोणताही त्रास होत नाही. हे कथाबीज लक्षात घेतले तर होळीचा सण सद्भाव आणि सद्विचारांना संवर्धित करणारा विकृत विचारांना मूठमाती देणारा ठरतो. या दिवशी पेटवली जाणारी होळी समाजातल्या अनेक घटकांना एकत्र आणते. अग्नी ही देवता मानली गेल्याने सार्वजनिक स्वरूपात तिची केली जाणारी पूजाअर्चा हीदेखील समृद्धीचेच वरदान देणारी ठरते.

### मतभेदांना मूठमाती

भारतात प्राचीन काळापासून यज्ञ संस्कृती नांदत आली आहे. प्राचीन काळी दुष्ट शक्तींचा नायनाट करण्यासाठी यज्ञ होत असत. एवढेच नव्हे तर घरात रोज लावला जाणारा दिवा हासुद्धा शुभविचारांचे दान देणारा आणि अज्ञानाचा अंधःकार दूर करणारा मानला जातो. सार्वजनिक स्वरूपात जेव्हा अशा प्रकारे ठिकठिकाणी होळी पेटवली जाते आणि तिला दाखवला जाणारा नैवेद्य या गोष्टीसुद्धा विकृती, दुष्टविचार, याचा विनाश करण्यासाठी केलेले आवाहन ठरते. या दिवशी केले जाणारे गोडाधोडाचे जेवण विशेषतः महाराष्ट्रातच होळी आणि पुरणपोळी हे समीकरण अतिशय घट्ट आहे. पूर्वी गावाची एकच होळी साजरी व्हायची. परंतु आता वस्ती वाढल्याने अगदी शहरातही छोट्या स्वरूपात चौकाचौकात होळ्या पेटवल्या जातात. कोकणात किंवा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लाकडांच्याऐवजी गोवऱ्यांचा वापर होतो. परंतु ही होळी पेटवताना अग्नीच्या साक्षीने मतभेदांचा किंवा मनभेदांचा अंधार दूर व्हावा असाच विचार असतो. कोकणामध्ये परंपरेने ही कथा रूढ आहे. त्यात मुलं पळवून नेणाऱ्या ढुंढा राक्षशीणीचा वध करण्याकरीता किंवा तिला पळवून लावण्याकरीता पेटवली गेलेली होळी शुभ आणि कल्याणकारी मानली गेली. आणि म्हणून आजही गाऱ्हाणं घालण्यापासून ते पालख्यांपर्यंत मोठ्या उत्साहात हा सण साजरा होतो. या निमित्ताने तिथल्या ग्रामदेवतेची होणारी पूजा आणि सामूहिकरित्या आपापल्या गावाविषयी व्यक्त होणारा शुभसंकल्प सामाजिक सद्भाव टिकवून ठेवणारा ठरला आहे. दिवाळीपेक्षाही होळीचा सण अधिक उत्साहात साजरा करून एका सशक्त परंपरेला आकंठ प्रवाहित ठेवण्याचं काम होत आलेलं आहे. वर्षाच्या अखेरीला येणारा हा एकमेव सण म्हणजे वर्षभरातल्या अनेक चुकांना किंवा मतभेदांना मूठमाती देण्यासाठी निमित्त ठरते. म्हणजेच विज्ञान युगातही मनाच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेली ही सणपरंपरा भौतिक साधनांपेक्षाही समाधानाचं मोठं धन देणारी ठरते. हेच सामाजिक संस्कृतीचे फार मोठे निदर्शक ठरते.

### समाजाची स्वयंस्फूर्तता

सर्वात महत्त्वाचा भाग असा आहे की, जवळपास सगळेच सण हे आपापल्या घरात किंवा सार्वजनिक स्वरूपात स्वयंस्फूर्तीने साजरे होतात. परंपरेने चालत आलेले नियम पाळून या सणवारांची रचना होते, व्यवस्था होते. सामाजिक स्तरावरची ही स्वयंस्फूर्तता अधिक उत्साह निर्माण करते. होळीलासुद्धा लाकडे गोळा करण्यापासून ते दुसऱ्या दिवशींच्या धुळवड किंवा रंगपंचमीपर्यंत या सणाच्या विविध रंगछटा व्यक्त होत असतात. व्यक्तिगत स्तरावर मनुष्यजन्माची ईश्वरी देणगी तितक्याच सन्मानाने जपण्याचे सण हे अतिशय प्रभावी माध्यम ठरले आहे. चाकोरीबद्ध आयुष्य हे निरस आणि नैराश्य निर्माण करणारे ठरते. त्यातही विकृतीचे लवकर अनुकरण करणारा मानवी स्वभाव जपायचा असेल तर अशा प्रकारची सणसंस्कृती अत्यंत मोलाची ठरते. यानिमित्ताने कौटुंबिक किंवा सामाजिक स्तरावर एकत्र येण्याची एक विलक्षण प्रक्रिया सहजपणे घडून येते. अगदी एकमेकांची ओळखपाळख नसताना होळीसाठी एकत्र येणारे लोक म्हणजे नैसर्गिकरित्या मानवी स्वभावाला प्रगल्भ करून जातात. ही गोष्ट खरी आहे की, काळाच्या ओघात अशा सणांचा गैरअर्थ काढून गैरवर्तन करण्याचेही प्रकार होत आहेत. या काळात काही ठिकाणी होणारी व्यसनाधिनता दुर्दैवीच म्हणावी लागते. परंतु होळीचा मूळ संदेश लक्षात घेतला तर वर्षाच्या अखेरीला या सर्वच वाईट विचारांची अखेर करायची त्याला निरोप देऊन चैत्रापासून सुरू होणाऱ्या नववर्षाचे स्वागत करायचे. म्हणजेच आपल्याच आयुष्याकडे तटस्थपणे पाहून त्याचा ताळेबंद किंवा लेखाजोखा घेता येत असतो.